आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार, दिनांक ११ मे २०२४

ठळक बातम्या

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज संपला: परवा १३ मे रोजी मतदान होणार.

2. भारताला आघाडीची जागतिक अर्थव्यवस्था बनविण्यात योगदान द्या- पर्सिस्टंट सिस्टमचे संचालक आनंद देशपांडे यांचं आयआयएम दीक्षांत सोहळयात विद्यार्थ्यांना आवाहन.

3. नागपुरातील भूकंपाच्या पार्श्वभूमीवर भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, मध्य क्षेत्राच्या आगामी क्षेत्रीय कार्यक्रमांमध्ये नागपूर क्षेत्रीय तपास होण्याची शक्यता.

4. नागपूर परिमंडलात महावितरणतर्फे 65 चार्जिंग स्टेशन्सची उभारणी, चार्जिंग करणाऱ्या वाहनांच्या संख्येत सातत्याने वाढ.

*****

प्रचार संपला

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज संपला. या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये परवा १३ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी लागणारं साहित्य, साधन-सामुग्री मतदान केंद्रावर पुरवण्यात आली आहे. या अकरा मतदारसंघांमध्ये एकूण २९८ उमेदवार निवडणूक लढवत असून, एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्रांवर, ५३ हजार ९५९ बॅलेट युनीट, २३ हजार २८४ कंट्रोल युनीट आणि २३ हजार २८४ व्हीव्हीपॅट यंत्राच्या आधारे, दोन कोटी २८ लाख १ हजार १५१ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. दरम्यान, आज शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांच्या दिग्गज नेत्यांनी आपापल्या उमेदवारांच्या वतीनं जोरदार प्रचार केला. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज नंदुरबार इथं महाविकास आघाडीचे उमेदवार गोवाल पाडवी यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं जालना लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारासाठी सभेला संबोधित केलं. त्यापूर्वी त्यांनी बीड जिल्ह्यात माजलगाव इथं महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेला संबोधित केलं. यावेळी त्यांनी काँग्रेससह इतर विरोधी पक्षांवर कडाडून टीका केली.

आयआयएम

भारताला आघाडीची जागतिक अर्थव्यवस्था बनविण्यात आपण काय योगदान देऊ शकतो, हा विचार करून तरुणांनी मार्गक्रमण करावं, असा सल्ला परसिस्टंट सिस्टमचे संचालक आनंद देशपांडे यांनी दिला. ते आज नागपूर आयआयएमच्या ८ व्या दीक्षांत सोहळयात अध्यक्षीय भाषण  करत होते. नागपूरच्या  वर्धा रोड स्थित मिहान येथील भारतीय व्यवस्थापन संस्था आयआयएम नागपूरचा आठवा वार्षिक दीक्षांत समारोह आज संपन्न झाला. झपाट्यानं बदलणाऱ्या जगात आपल्या करियरला १० -१० वर्षांच्या टप्प्यात विभागा. सर्वात प्रथम शिकायला शिका, असं ते म्हणाले. जितक्या लवकर आणि जितक्या चांगल्या पद्धतीनं शिकाल, त्यावर पुढचं करियर अवलंबून राहील, असं ते म्हणाले. देशात नोकऱ्या निर्माण करणारे व्हा आणि बेरोजगरीच्या समस्येवर तोडगा काढायचा प्रयत्न करा, असं देखील देशपांडे म्हणाले. सुरुवातीला आयआयएम नागपूरचे संचालक डॉ.भीमराया मैत्री यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल उपस्थितांसमोर मांडला. आयएमएम नागपूरमध्ये चॅट जीपीटी.,एआय यासारखे विविधांगी  अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. या सोहळयात २९० विद्यार्थ्यांना एमबीए आणि एक्सिक्युटिव्ह एमबीए पदवी प्रदान करण्यात आली.

<u>प्रियंका गांधी</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ मतांसाठी आश्वासन देत असल्याचा आरोप कॉंग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत केला. राजकीय फायद्यासाठी नरेंद्र मोदी छान छान गोष्टी सांगतात. मात्र सर्वसामान्यांशी असलेला त्यांचा संपर्क तुटल्याचा दावा प्रियंका यांनी या भाषणात केला. देशभरात विविध ठिकाणी आदिवासींवर झालेल्या अत्याचारांना विद्यमान सरकार जबाबदार आहे. देशभरातल्या २२ लाख आणि राज्यातल्या २ लाख आदिवासींना या सरकारनं पट्टे दिले नाहीत, असंही त्या म्हणाल्या. या देशात शेतकरी, कष्टकरी नव्हे, तर मोठ्या उद्योगपतींची कर्ज माफ होत असल्याचा आरोप त्यांनी केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. त्यांना नव्या संसदेच्या उद्घाटनाला आमंत्रितही केलं नाही, यावरून पंतप्रधान कशा रितीनं त्यांचा अनादर करतात ते दिसून येतं, असं त्यांनी सांगितलं. राज्यातलं महाविकास आघाडी सरकार पाडल्याबद्दलही त्यांनी मोदी यांच्यावर टीका केली. राज्यातल्या आमदारांवर दबाव आणून, खटले भरून, भ्रष्टाचार करून सत्ता मिळवल्याचा आरोप गांधी यांनी केला.

परिचारिका परिषद

'आपल्या परिचारिका आपले भविष्य, काळजीची आर्थिक शक्ती' ही यावर्षीची संकल्पना असल्याचं आंतरराष्ट्रीय परिचारिका परिषदेनं घोषित केलं आहे. या संकल्पनेचं अनावरण मेजर जनरल आय डी फ्लोरा, अतिरिक्त डीजीएमएनएस यांनी केलं. यानिमित्तानं 'रुग्णसेवेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर: शाप की वरदान' या विषयावर चर्चा आणि गटचर्चेचं आयोजन करण्यात आलं होतं. या गटातील जेष्ठ सदस्यांनी परिचारक व्यवसायातील आव्हानं, परिचारिकांना सक्षम बनवण्याचा दृष्टिकोन, परिचारिकांची नेतृत्व भूमिका, परिचारिका शिक्षण, आरोग्यसेवेतील डिजिटलायझेशन, परिचारिकांचे तणाव' इत्यादींसह विविध पैलूंवर चर्चा केली. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजयी स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला, तसंच गुणवंत परिचारक अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आलं. कॅप्टन दीपा शजन यांना पुष्पनरंजन पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. प्रमुख पाहुण्यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केलं.

भूकंपाच्या हालचालींची नोंद

गेल्या 3 मे ते 9 मे दरम्यान, संपूर्ण नागपूर परिसरात 2.4 ते 2.7 तीव्रतेचे भूकंप सिस्मोग्राफवर नोंदवले गेले. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी (NCS) द्वारे प्रसिद्ध केलेल्या सिस्मोग्राफमध्ये मागील भूकंपाच्या घटनांची नोंद करण्यात आली होती, जी सर्वसामान्य जनतेला जाणवली नाही. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी, नवी दिल्ली, पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत एक विभाग असून, भारत सरकारद्वारे नामांकित आहे आणि या भूकंपाच्या घटनांचा अहवाल देण्यासाठी अधिकृत एजन्सी आहे. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनं प्रसिद्ध केलेल्या भूकंपप्रवण क्षेत्राच्या नकाशात, नागपूर क्षेत्र भूकंपासाठी कमी संवेदनाक्षम असलेल्या झोन-II अंतर्गत येतं. मोठ्या भूकंपांपासून नागपूर क्षेत्र हे तुलनेनं सुरक्षित मानलं जात असलं, तरी या भागात छोटे भूकंप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याआधीही भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेनं भूकंपांबाबत वेळोवेळी अभ्यास करून अहवाल जारी केले आहेत. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, मध्य क्षेत्र या घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून आहे. स्थानिक प्रशासनाच्या विनंतीवरून, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, मध्य क्षेत्राच्या आगामी क्षेत्रीय कार्यक्रमांमध्ये नागपूर क्षेत्रीय तपास होण्याची शक्यता आहे. त्यामुळं येत्या काळात भूगर्भशास्त्रज्ञ सविस्तर अभ्यास करून या तुरळक भूकंपाची कारणं शोधण्याचा प्रयत्न करतील.

## इलेक्ट्रिक वाहन

इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी लागणारी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी महावितरणला राज्याची नोडल एजन्सी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. महावितरणच्या पुढाकारानं नागपूर परिमंडलात एकूण 65 चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात आली आहेत. यात महावितरणच्या स्वतःच्या नागपूर शहरातील 6 चार्जिंग स्टेशन्ससह नागपूर जिल्ह्यातील 53 आणि वर्धा जिल्ह्यातील 6 खासगी चार्जिंग स्टेशन्सचा समावेश आहे. या स्टेशन्सवर चार्जिंग करणाऱ्या वाहनांची संख्या सातत्यानं वाढत आहे. नागपूर शहरातील गांधीबाग विभागात कळमना आणि मेयो इथल्या 33 केव्ही उपकेंद्रात, महाल विभागातील मॉडेल मिल उपकेंद्रात तर सिव्हील लाईन्स विभागातील नारा, एमआरएस आणि बिजलीनगर उपकेंद्र इथं महावितरणची स्वत:ची चार्जिंग स्टेशन्स आहेत. याशिवाय भारत पेट्रोलियमची बाजारगाव, कामठी, टेकाडी, पारशिवनी, बोरगाव, रामटेक, बुटीबोरी, हिंगणा, कामठी रोड इथं; हिंदुस्तान पेट्रोलियमची सातनवरी, नेरी, कापसी, चिचभवन आणि भंडारा रोड इथं; याशिवाय टाटा पॉवर, रिलायन्स बीपी मोबिलीटी, नागपूर महानगरपालिका, नांगिया मोटर्स, बुटीबोरी नगर परिषद, वाडी नगर परिषद, जगदंबा देवस्थान कोराडी, सुजलॉन एनर्जी यांच्यासह काही खासगी व्यावसायिकांची चार्जिंग स्टेशन्स शहराच्या इतरही भागात आहेत. त्याचप्रमाणं वर्धा जिल्ह्यातील लक्ष्मी हॉटेल, एसव्हीएल एजी हाऊस, देवगण, हिंगणघाट, नागलवाडी आणि कारंजा एमआयडीसी या भागात खासगी चार्जिंग स्टेशन्स आहेत.

## प्रो.आनंद पाटील

वर्धा इथल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे कुलसचिव म्हणून प्रो.आनंद पाटील यांनी काल पदभार सांभाळला. प्रो. पाटील हे विश्वविद्यालयातील दूर शिक्षण संचालनालयाचे संचालक आहेत. त्यांना कुलसचिव पदाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. विश्वविद्यालयातील प्रशासकीय आणि अकादमिक कामांना गती देण्याला प्राधान्य देण्यात येईल, अशी प्रतिक्रिया त्यांनी कार्यभार ग्रहण केल्यानंतर व्यक्त केली. नांदेड जिल्ह्यातील माचनुर येथे जन्मलेले प्रो. पाटील यांनी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड येथून हिंदी, इतिहास आणि अर्थशास्त्रात बी.ए. तर हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातून हिंदीतून एम.ए., एम.फिल. स्वर्ण पदकासह आणि पीएच.डी. प्राप्त केली आहे.

निधी घोटाला

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव अगोदर लोकवर्गणीतून साजरा करण्यात आला. काही दिवसांनी यासाठी पाच लाखांचा निधी आला. हा निधी परत न करता बोगस बिलं सादर करून पाच लाख रुपये हडप करण्यात आले. हा घोटाळा करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावं, अशी मागणी भंडारा पंचायत समिती सभापती रितेश वासनिक यांनी विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा अधिकारी जि.प.भंडारा यांच्याकडं तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

कुस्तीपटू निशा दहिया

भारताची कुस्तीपटू निशा दहियानं आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवली आहे. तुर्कीमध्ये काल झालेल्या जागतिक ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत निशानं ६८ किलो वजनी गटात उपान्त्य फेरीत रोमानियाच्या खेळाडूचा पराभव केला. पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवणारी निशा ही पाचवी भारतीय महिला कुस्तीपटू आहे. याआधी अंतिम पंघाल, विनेश फोगाट, अंशु मलिक, रितिका हुडा या देखील ऑलिम्पिकसाठी पात्र ठरल्या आहेत.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन

जास्त वय असताना कमी वयाची कागदपत्रं दाखवून स्पर्धेत उतरणाऱ्या क्रिकेट खेळाडूंवर तीन वर्षांची बंदी घालून तातडीनं दंड ठोठाविण्याबाबतचा निर्णय नुकताच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननं घेतला आहे. यासंदर्भात देखरेख आणि पडताळणी करण्यासाठी एका समितीची नेमणूक करण्यात आल्याचंही पत्रात नमूद करण्यात आलं आहे. सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १९वर्ष वयोगटातील स्पर्धेतील काही खेळाडू हे जास्त वयाचे असल्याचं आढळून आलं आहे.

हवामान

विदर्भात अमरावती, अकोला, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता असून या जिल्ह्यांना पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

****